**प्रेसनोट दि. ३०.०५.२०२३**

लोकसेवक श्री. अजित मुबारक मुल्ला, वय ४७ वर्ष, व्यवसाय :- स्थापत्य अभियांत्रिकी सहायक, वर्ग-३, पंचायत समिती कवठेमहांकाळ रा. शासकीय निवासस्थान रूम नंबर १ नविन तहसिलदार ऑफीसच्या समोर, नगरपंचायत चौक कवठेमहांकाळ ता.कवठेमहांकाळ, जि.सांगली यांना १३,०००/- रुपये लाच स्विकारले नंतर रंगेहात पकडले, सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांचे वडीलांचे नावे प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुल बांधकाम करण्यासाठी मंजुर निधी मधील तिसरा व चौथा हप्ता जमा करण्यासाठी लोकसेवक श्री. मुल्ला, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक, वर्ग-३ पंचायत समिती कवठेमहांकाळ यांनी तक्रारदार यांचेकडे २०,०००/- रूपये लाच मागणी केली असल्याबाबतचा तक्रारी अर्ज तक्रारदार यांनी दि. २६.०५.२०२३ रोजी अँन्टी करप्शन ब्युरो सांगली पथकास दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दि. २६.०५.२०२३ रोजी व दि. ३०.०५.२०२३ रोजीचे ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये श्री. मुल्ला यांनी तक्रारदार यांचे वडीलांचे नावे मंजुर घरकुल योजनेतील तिसरा व चौथा हप्ता जमा करण्यासाठी २०,०००/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती १३,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर आज दि. ३०.०५.२०२३ रोजी म्हसोबा गेट कवठेमहांकाळ या ठिकाणी सापळा लावला असता लोकसेवक श्री. मुल्ला, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक, वर्ग-३ पंचायत समिती कवठेमहांकाळ यांनी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करून १३,०००/- रूपये लाच रक्कम स्विकारले असताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

त्या अनुषंगाने लोकसेवक श्री. अजित मुबारक मुल्ला, वय ४७ वर्ष, व्यवसाय- स्थापत्य अभियांत्रिकी सहायक, वर्ग-३ पंचायत समिती कवठेमहांकाळ रा. शासकीय निवासस्थान रूम नंबर १ नविन तहसिलदार ऑफीसच्या समोर, नगरपंचायत चौक कवठेमहांकाळ यांचेविरुध्द कवठेमहांकाळ पोलीस स्टेशन येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. अमोल तांबे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. विजय चौधरी सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संदीप पाटील, पोलीस उप अधीक्षक, पोलीस अंमलदार अजित पाटील, प्रितम चौगुले, ऋषीकेश बडणीकर, पोपट पाटील, सुदर्शन पाटील, रविंद्र धुमाळ, चंद्रकांत जाधव, सिमा माने, उमेश जाधव चालक वंटमुरे यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स ॲप नंबर व मोबाईल नंबर ९८२१८८०७३७ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल ॲप - www.acbmaharashtra.net
२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB
३) वेबसाईट – www.acbmaharashtra.gov.in

(पोलीस उप अधीक्षक * लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली — सत्यमेव जयते)

(संदीप पाटील)
पोलीस उप अधीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो, सांगली.

Scanned with OKEN Scanner